प्रशासकीय मान्यता
शासकीय कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेतील रेडिओथेरपी विभागाच्या व्हर्टीकल एक्सटेशन बांधकामाअंतर्गत बेसमेंट + २ ऱ्या व ३ ऱ्या मजल्याचे बांधकाम

महाराष्ट्र शासन
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
शासन निर्णय क्रमांक : जीकेए-२०१७/प्र.क्र.४२५/प्रशा-१
गोकुळदास तेजपाल रुग्णालय आवार, नविन मंत्रालय, ९ वा मजला,
लोकमान्य टिळक रोड, मुंबई - ४०० ००१.
दिनांक : १५ मे , २०१८.

वाचा :

१) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्रमांक : राकसं-२०१६/प्र.क्र.४२४/प्रशा-१,दिनांक १५.१०.२०१६.
२) संचालक वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई यांचे क्रमांक : संवैशिवसं/कर्करोग/रुग्णाऔ/राज्यकर्करोगबांधकाम/प(आय)/२०१७, ११७१२ दिनांक : २५.१०.२०१७.
३) वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, शासन निर्णय, क्रमांक : पीएमसी-२०१७/१११५/प्र.क्र.४२३(अ)/प्रशा-१,दिनांक ०८.०२.२०१८.

शासन निर्णय :

शासकीय कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेतील रेडिओथेरपी विभागाच्या व्हर्टीकल एक्सटेंशन बांधकामाअंतर्गत बेसमेंट + २ ऱ्या व ३ ऱ्या मजल्याचे बांधकाम, केंद्र शासनाच्या Strengthening of Tertiary Care for Cancer Scheme of National Program for Prevention and Control of Cancer, Diabetes, Cardiovascular Diseases & Stroke (NPCDCS) या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत (एन.पी.सी.डी.सी.एस कार्यक्रमांअंतर्गत) प्राप्त निधीमधून करण्याकरीता खालील तक्त्यात दर्शविलेल्या व सचिव समितीने मान्यता दिलेल्या एकूण रुपये ३१०७.४६ लक्ष (अक्षरी रुपये एकतीस कोटी सात लक्ष शेहचाळीस हजार फक्त) इतक्या खर्चाच्या अंदाजपत्रकास खालील बाबींच्या अधीन राहून प्रशासकीय मान्यता देण्यात येत आहे.

अ. क्र.	स्थापत्य दुरुस्ती बांधकामाचे नाव	प्रस्तावित केलेली अंदाजित रक्कम रुपये	सचिव समितीने मान्यता दर्शविलेली किंमत रुपये
१.	शासकीय कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेतील रेडिओथेरपी विभागाच्या व्हर्टीकल एक्सटेंशन बांधकामाअंतर्गत बेसमेंट + २ ऱ्या व ३ ऱ्या मजल्याचे बांधकाम	३८,३८,७३,६१५	३१,०७,४६,०००
	एकूण	३८,३८,७३,६१५	३१,०७,४६,०००

२. सदर प्रकरणी संदर्भाधीन शासन निर्णय दिनांक ०८.०२.२०१८ मधील नमूद तरतूदीनुसार केंद्र शासनाच्या अधिपत्याखालील प्रामुख्याने रुग्णालयीन बांधकामाशी संबंधीत NBCC, HLL, HSCC या सार्वजनिक उपक्रम असलेल्या कंपन्यांकडून देकार मागवून बांधकामाबाबतची कार्यवाही करण्यासंदर्भात स्वतंत्रपणे कार्यवाही करण्यात येईल.

३. नियोजित जागा उपभोक्ता विभागाच्या ताब्यात असल्याचे तसेच काम सुरु करण्यापूर्वी जागेच्या मालकी हक्काबाबतची पूर्तता संस्थेने करुन घ्यावी.

४. सदर कामासाठी जागेची उपलब्धता, जागा पुरेशी आहे किंवा नाही, याबाबतची खात्री संबंधीत संस्था प्रमुखांनी करावी.

५. सदर कामासाठी निधीची तरतूद झाल्यानंतर प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येईल. याविषयी Strengthening of Tertiary Care for Cancer Scheme of National Program for Prevention and Control of Cancer, Diabetes, Cardiovascular Diseases & Stroke (NPCDCS) या केंद्र पुरस्कृत योजनेअंतर्गत केंद्र व राज्य शासनाकडून त्यांच्या हिश्श्याच्या (६०:४०) निधीची तरतूद झाल्यानंतर सदर काम हे खाली नमूद केलेल्या केंद्र व राज्य लेखाशीषाअंतर्गत मंजूर तरतूदीतून करण्यात येईल.

केंद्र हिस्सा लेखाशीर्ष		राज्य हिसा लेखाशीर्ष	
मागणी क्रमांक एस-४		मागणी क्रमांक एस-४	
४२१०	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च	४२१०	वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य यावरील भांडवली खर्च
०३	वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन	०३	वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन
१०५	विषमचिकित्सा	१०५	विषमचिकित्सा
(००) (५१)	कर्करोग, मधुमेह, ह्दयविकास आणि आघात यावरील प्रतिबंध व	(००)(५२)	कर्करोग, मधुमेह, ह्दयविकास आणि आघात यावरील प्रतिबंध व

	नियंत्रणाबाबतचा राष्ट्रीय कार्यक्रम (केंद्र हिस्सा ६०%)		नियंत्रणाबाबतचा राष्ट्रीय कार्यक्रम (राज्य हिस्सा ४०%)
	४२१० २५८१		४२१० २५९२
	५३-मोठी बांधकामे		५३-मोठी बांधकामे

६. हा शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : विअप्र-२०१३/प्र.क्र.३०/२०१३/विनियम, दिनांक १७ एप्रिल, २०१५ अन्वये वित्तीय अधिकार नियम पुस्तिका, १९७८ भाग पहिला - उप विभाग पाच मधील महाराष्ट्र सार्वजनिक बांधकाम नियमपुस्तिका अंतर्गत परिच्छेदांखाली प्रदान करण्यात आलेले वित्तीय अधिकार मधील अ.क्र.१, परिच्छेद क्रमांक १३४ अन्वये प्रशासकीय विभागाला प्रदान केलेल्या अधिकारानुसार व सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ५१५/इमा-३, दिनांक ०५.१२.२०१७ अन्वये मिळालेल्या सहमतीच्या अनुषंगाने तसेच सचिव समितीने दिनांक २०.०३.२०१८ रोजीच्या बैठकीत दिलेल्या सहमतीच्या अनुषंगाने निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक २०१८०५१५१७२५५१९५१३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Arun M. Dahale

Digitally signed by Arun M. Dahale
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Medical Education and Drugs Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=b335b52903c5914ab29c9ba5a50897b7b2244d66593f50dd713da83860912503, cn=Arun M. Dahale
Date: 2018.05.15 17:42:35 +05'30'

(अ.मु.डहाळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा), नागपूर, महाराष्ट्र.
२. मा.अपर मुख्य सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
३. संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन, मुंबई.
४. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व कर्करोग रुग्णालय, औरंगाबाद.
५. सार्वजनिक बांधकाम विभाग, (इमारत-१/३) मंत्रालय, मुंबई.
६. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम औरंगाबाद प्रादेशिक विभाग,औरंगाबाद.
७. कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, वर्ल्ड बँक प्रोजेक्ट डिव्हीजन,औरंगाबाद.
८. जिल्हा कोषागार अधिकारी, औरंगाबाद.
९. निवडनस्ती (प्रशा-१)